महाराष्ट्र शासन
# शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर
बार्शी रोड, लातूर-४१३५३१ दुरध्वनी क्र.:०२३८२-२२११८४(O), २२११७५(P)
ईमेल :- office.grwplatur@dtemaharashtra.gov.in, 0136office@msbte.com,
principal.grwplatur@dtemaharashtra.gov.in, 0136principal@msbte.com
website : www.grwpl.org.in DTE Code : 2016 MSBTE Code : 0136

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्र.शानिमतंला/आस्था/२०२२/278 दिनांक :- 10 MAR 2022

कार्यालयीन आदेश:-

विषय:- आरोग्य तपासणी शिबीर (Health Checkup) चे आयोजन करणे बाबत...

संदर्भ:- या कार्यालयाचे का. आ. जा. क्र.शानिमतंला/आस्था/२०२२/२५८, दि.०७/०३/२०२२

शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर आणि महानरपालिका, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ११/०३/२०२२ रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० पर्यंत प्रथम वर्षाच्या विद्यार्थीनीकरीता आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आलेले आहे. सर्व विभागप्रमुख व संस्थेतील सर्व गृहपाल यांनी प्रथम वर्ष विद्यार्थीनींना सदर माहिती देऊन त्यांना सकाळी ठिक ९.०० वा. संस्थेच्या राजर्षी शाहू महाराज सभागृहात उपस्थित रहाण्यास सांगावे. तसेच सर्व गृहपाल यांनी कोविड-१९ च्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करून सभागृहात शिस्त राखावी आणि प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थीनींना आरोग्य तपासणी शिबीराचा लाभ घेण्यास प्रेरीत करावे.

आरोग्य तपासणी शिबीराचे सुनियोजन करण्याकरीता खालील समितीचे गठन करण्यात येत असून सर्व समिती सदस्यांनी आपआपली कामे चोखपणे बजावणे गरजेचे आहे. <u>दि. ११/०३/२०२२ रोजी प्रथम वर्षाच्या सैद्धांतिक व प्रात्यक्षिक तासिका होणार नाहीत याबातही पुर्वकल्पना सर्व अधिकारी कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांनींना द्यावी.</u>

आरोग्य तपासणी शिबीराकरीता गठीत समिती खालीलप्रमाणे:-

| अ. क्र. | समितीचे नाव | समितीतील अधिकारी/ कर्मचारी याचे नाव व पदनाम | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १ | स्वागत समिती | श्री. अ. म. आगरकर, प्राचार्य, श्रीमती सी. एस. गरत- जिमखाना उपाध्यक्ष, श्री. आर. आर. सावंत- जिमखाना सचिव. | महानगरपालिका लातूर चे उपायुक्त व सर्व वैद्यकीय अधिकारी यांचे स्वागत करणे व कार्यक्रमाची प्रस्तावना करणे. |
| २ | सभागृह व्यवस्थापन समिती | श्रीमती ए. ए. गाडवे- कुलमंत्री, श्रीमती सी. एस. गरत - जिमखाना उपाध्यक्ष, श्रीमती एस. आर. कागणे- वसतिगृह लिपीक, ए. डी. कांबळे, व्ही. डी. घोडके, टी. एन. दळवे, | सभागृहाचे व्यवस्थान, कार्यक्रमाचे संचालन, वैद्यकीय अधिकारी यांचे करीता टेबल, खुर्ची इ. व्यवस्था. |
| ३ | अल्पोपहार समिती | श्रीमती ए. ए. गाडवे- कुलमंत्री, श्रीमती एस. आर. कागणे- वसतिगृह लिपीक, श्री. आर. आर. सावंत- जिमखाना सचिव. व्ही. डी. घोडके, टी. एन. दळवे, | उपायुक्त व वैद्यकीय अधिकारी यांचे सहाय्यक यांचेकरीता दुपारी ३.०० वा. नाष्टा व चहापानाची व्यवस्था. |
| ४ | पंजीकरण व शिस्तपालन समिती. | श्रीमती ए. ए. गाडवे- कुलमंत्री, श्रीमती एस. आर. कागणे- वसतिगृह लिपीक, श्री. आर. आर. सावंत- जिमखाना सचिव. व सर्व गृहपाल. | सर्व विद्यार्थ्यांकडून विहीत नमुन्यातील आरोग्य तपासणी अर्ज भरून घेणे व कोव्हिड- १९ च्या मार्गदर्शक सुचनांनुसार शिस्त पालन (सोशल डिस्टंस, मास्क) इ. |

महानगरपालिका तर्फे सादर होणारे आरोग्य तपासणी अर्जाची छायांकीत प्रत वसतिगृह लिपीक यांनी कार्यक्रमादरम्यान सोबत ठेवणे गरजेचे आहे.

( डॉ. अ. म. आगरकर )
प्राचार्य,
शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर

प्रत:- सर्व संबंधितांना.